# —प्रेस नोट—

## बृहन्मुंबई पोलीस आयुक्तालयातील एम.आय.डी.सी पोलीस ठाणे, मुंबई यांनी सन २०२३ पासून अपहरण झालेल्या ०८ वर्षीय मुलाचा शोध घेवून गुन्हा उघडकीस आणले बाबत.....

दि: २२/१०/२०२३ रोजी एम.आय.डी.सी पोलीस ठाणे, मुंबई येथे स्नेह सदन बाल अनाथालयचे कर्मचारी नामे श्रीमती. चंचल प्रसाद नायर राहणार— स्नेह सदन विनालय कॅम्पस, अंधेरी पुर्व मुंबई यांनी ०८ वर्षाच्या मुलाचे अपहरणाची तक्रार दिलेवरून गुन्हा रजि क्र. ६३०/२३ कलम ३६३ भा द वि अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. नमुद गुन्हयातील अल्पवयीन बालक नामे अनिस खान वय— ०८ वर्षे हा जुहू पोलीस ठाणेचे हद्दीतील जुहू चौपाटी येथे बेवारस फिरत असतांना मिळून आल्याने जुहू पोलीस ठाणेचे पोलीस उपनिरीक्षक वाघ यांनी मुलाचे पालकाचा सर्वत्र शोध घेवून पालक मिळून न आल्याने त्यास दिनांकः— २१/१०/२०२३ रोजी स्नेह सदन अनाथालय, अंधेरी पुर्व, मुंबई याठिकाणी जमा करण्यात आले होते. स्नेह सदन येथे जमा करण्यात आलेला अल्पवयीन मुलगा अनिस खान वय — ०८ वर्षे हा कोणालाही न सांगता स्नेह सदन येथून निघून गेला होता. त्याबाबत तक्रार प्राप्त झाल्यामुळे वर नमुद प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्हयाच्या अनुषंगाने हरविलेल्या मुलाचे पालक व त्याचे रहाते घर याबाबत कोणतीही माहिती नसल्याने त्या मुलाचा शोध घेण्याच्या अनुषंगाने मागील ०३ वर्षापासून अडथळे निर्माण होत होते. नमुद गुन्हयातील मुलाचा शोध घेणेसाठी मा. पोलीस उपआयुक्त साो, पश्चिम परिमंडळ— ०३, अंधेरी यांचे आदेशानुसार विशेष पथकात पोलीस उपनिरीक्षक सागर हुजरे व पथक यांची नेमणूक करण्यात आली होती.

नमुद पथकाने अल्पवयीन बालकाचा तपासास सुरूवात केली असता नमुद अल्पवयीन मुलाबाबत महाराष्ट्रातील, परराज्यातील व रेल्वे पोलीस ठाणे येथे सन २०२३ मधे दाखल असलेल्या वय वर्षे ०५ ते १५ या वयोगटातील अपहरण झालेल्या सर्व मुलांचा तपास केला. तसेच सी.सी.टी.एन.एस, आय.सी.जी.एस पोर्टल द्वारे भारतात हरविलेल्या व जमा केलेल्या मुलांची, महाराष्ट्र हरविलेली व्यक्ती शोध केंद्र, चाईल्ड हेल्पलाईन क्र. १०९८ वर संपर्क करून जमा झालेल्या मुलांची माहिती प्राप्त करण्यात आली.

तसेच नमुद पथकाने मुंबई शहर व उपनगर परिसरातील सर्व बाल अनाथलायात जावून वय ०८ ते १३ वर्षे वयोगटातील मुलांची सन २०२३ पासून ते अदयापर्यंत जमा केलेल्या मुलांचे फोटो व माहिती प्राप्त केली. त्यानुसार माटुंगा येथील बालसुधारगृहातील जमा झालेल्या अल्पवयीन बालकाचा मिळता—जुळता फोटो प्राप्त झाला होता. सदर ठिकाणी जावून फोटो बाबत चौकशी केली असता मांटुगा संस्थेमध्ये असणारा बालकाचे नाव अमन शेख असल्याबाबत प्राथमिक माहिती प्राप्त झाली. सदर बालकाचे पालक मालवणी येथे रहावयास असल्याबाबत माहिती प्राप्त झाली होती. मालवणी पोलीस ठाणेस हद्दीमध्ये जावून चौकशी केली असता बालकाचे पालक व आत्या यांना अल्पवयीन बालकाचा फोटो दाखविला असता तो त्यांनी ओळखून त्यांचा भाचा असल्याबाबत सांगितले. तसेच नमुद अल्पवयीन बालक हा सन २०२३ पासून हरविलेला असल्याबाबत सांगितले. अशा प्रकारे एम आय डी पोलीस ठाणेचे निगराणी पथकाने अथक परिश्रम घेवून मागील ०३ वर्षापासून दोन वेगवेगळा नावाने नोंद असलेल्या मुलाचा प्राप्त फोटोच्या आधारे शोध घेवून अपहरण झालेल्या बालकास त्याचे पालकांचे ताब्यात देवून सदरची उल्लेखनिय कामगिरी केली आहे.

सदरची कामगिरी मा. पोलीस आयुक्त सो, श्री. देवन भारती, मा. पोलीस सहआयुक्त( का व सु) श्री. मनोज शर्मा, अप्पर पोलीस आयुक्त सो, पश्चिम प्रादेशिक विभाग, मुंबई श्री. डॉ. अभिनव देशमुख, पोलीस उपआयुक्त श्री. दत्ता नलावडे, सहाय्यक पोलीस आयुक्त श्री. योगेश शिंदे यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक घनश्याम नायर, पोलीस निरीक्षक(गुन्हे) सुनिल कारंडे, पोलीस उपनिरीक्षक सागर हुजरे, पोलीस उपनिरीक्षक किरण पर्बत, पो ह क्र. ०३०८४९/ अजय बोटे, पो ह क्र. ०६.०१९४/महेश गुजलवार, पो शि ११४१७३०/ प्रताप चव्हाण यांनी पार पाडली आहे.